शपथेवर सुरु
सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपासः-
मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - पो.कॉ/ सुनिल एकनाथ ढोले,
वयः - ४८ वर्षे,
नेमणुक. - शेवगाव डेप्युटी ऑफीस चालक.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.पी.औताडे यांचे मार्फत सुरुः-

दि. २८/०४/२०२४ रोजी मी सोनई पोलिस स्टेशन येथे चालक म्हणुन कार्यरत होतो. सदर दिवशी ए.पी.आय शेळके साहेब यांना फोनद्वारे गोपनिय माहिती मिळाली की, पानसवाडी शिवारात काही इसम हातभट्टी दारू तयार करत आहेत. ए.पी.आय शेळके साहेब यांनी पो.हे.कॉ. गावडे यांना फोनद्वारे सांगितले की, पानसवाडी शिवारात सोनई ते घोडेगाव जाणा-या रोडवर हातभट्टीची दारू तयार करत आहेत. त्यावेळी आम्ही घोडेगाव येथे होतो. त्यानंतर मी, हवालदार गावडे, पो.कॉ. रवी गर्जे, पो.कॉ. आघाव असे सर्वजण गाडीमध्ये सोनई ते घोडेगाव जाणा-या रोडवर पानसनाल्याच्या जवळ असलेल्या मुळा कारखान्याच्या दक्षिणेला गेलो असता तिथे बाळासाहेब काकाजी ब्राम्हणे नावाचा इसम मिळुन आला. तसेच तिथे आम्हाला कच्चे रसायन ३ प्लॅस्टीकचे बॅलरमध्ये मिळुन आले. तसेच ४० लिटर तयार हातभट्टी दारू प्लॅस्टीकच्या बॅलरमध्ये मिळुन आले. तिथे काही तयार हातभट्टी दारू ही रसायनीक विश्लेषण केंद्राकडे पाठविण्यासाठी बाजुला काढली. उर्वरीत मुद्देमाल नष्ट केला. मिळुन आलेल्या इसमांस पोलिस स्टेशनला घेवुन आलो. त्यानंतर मी गुन्हा दाखल केला. आता मला सदरची फिर्याद दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. फिर्यादीस निशाणी १८ देण्यात येते. आरोपींस पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर नाही.

उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. पी.सी.नहार यांचेमार्फत सुरु-

२. हे म्हणणे खरे आहे की, सोनई रोडवर कारखाना आहे व तिथे कारखान्यामुळे लोकांची वरदळ असते. हे म्हणणे खरे नाही की, सदर रोडवर कारखान्याचे ट्रॅक्टर व ऊसाच्या गाड्या चालु असतात. छापा टाकण्यासाठी जाण्यापुर्वी मी स्टेशन डायरीला नोंद केली नव्हती.

हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलो, तिथे मला कच्चे रसायन व तयार हातभट्टी दारू मिळुन आली हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे आहे की, चालक म्हणुन गाडीत बसणे हे माझे काम आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर आरोपी मिळुन आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावरून काहीही एक जप्त केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, शासकीय कोठा पुर्ण करण्यासाठी मी आरोपीविरूध्द खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, मी वरीष्ठांच्या सांगण्यावरून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा.

दिनांक-१४/०७/२०२५.